भगवान विष्णूचा

सहावा अवतार

# परशुराम

: लेखक :

धोंडो विष्णु सप्रे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. 309 दिनांक
विषय

जयहिंद प्रकाशन
झावबावाडी, मुंबई २

BVBK-0400351

मूल्य ८० पैसे

# सहावा अवतार !

ज्या महापुरुषांनीं दुष्टांना शासन केलें, अत्याचारांचा नायनाट केला, सज्जनांचें रक्षण केलें आणि धर्माची (मानवी मूल्यांची) स्थापना केली, त्यांना आपण अवतार समजतों. आपली अशी समजूत आहे कीं, भगवान विष्णु असे दहा अवतार धारण कर-णार. त्यांपैकीं सहावा अवतार परशुराम हा होय.

परशुरामाला ऐतिहासिक व्यक्ति मानायला पुष्कळच आधार आहे. त्यानें पश्चिम भारताच्या भडोच ते थेट कन्याकुमारी या किनाऱ्यावर आर्यांच्या वसाहती स्थापन केल्या. या भागांपैकीं कोंकणांतील चित्पावन ब्राह्मण आणि मलबारमधील नंबुद्री ब्राह्मण स्वतःस वीर परशुरामाचे वंशज समजतात. मलबारमध्यें अद्यापि परशुरामाचा शक चालू आहे. भारतांतील अनेक स्थानांचा परशु-राम-कथेशीं संबंध पोहोंचतो.

परशुरामानंतर राम, कृष्ण आणि बौद्ध हे अवतार झाले. या दृष्टीनें पाहिलें तर परशुरामाचा काल सहा हजार वर्षांपूर्वीचा मानावा लागेल. परशुरामापूर्वीं झालेल्या वामन, नृसिंह आदि अवतारांच्या कथांमध्यें आर्यांच्या राजसंस्थांचा संबंध येत नाहीं. म्हणजे भारतामध्यें आर्यांच्या वसाहती सुस्थिर झाल्यावर परशुरामावतार झाला असला पाहिजे. त्या वेळीं वर्णसंस्थाही शिथिल दिसते. परशुरामाची आई, आजी, पणजी आदि ब्राह्मण स्त्रिया राजकन्याच होत्या.

सत्ता प्राप्त झाली कीं मनुष्याला त्याचा मद चढतो आणि तो अत्याचारी बनतो ही गोष्ट कार्तवीर्य राजांमध्यें आपणांस दिसून येते. या अत्याचारी राजवटीविरुद्ध बंड करण्याचा जनतेचा हक्क परशुरामानें प्रस्थापित केला. या बंडामध्यें त्यानें मिळविलेलें यश महान खरेंच; पण त्यानें स्थापन केलेल्या वसाहतींचें विधा-यक कार्य त्याहूनही भव्य आहे, आणि या सर्व कार्यामध्यें त्यानें दाखविलेला निरिच्छपणा आणि त्यागवृत्ति ही खरोखरच दिव्य असून त्यामुळेंच आमचें मस्तक त्याच्यापुढें नम्र होतें.

—धों. वि. सप्रे


प्रकाशक : ग. का. रायकर, जय हिंद प्रकाशन, मुंबई ४००००२
मुद्रक : वि. ज. देसाई, वैभव प्रिंटिंग प्रेस, मुंबई ४००००४
पुनर्मुद्रण : फेब्रुवारी १९७९ : (सर्वाधिकार प्रकाशकाधीन)

# तेजस्वी वंश

" पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भावि काल ! "

फार प्राचीन काळीं महर्षि भृगु या नांवाचे एक तेजस्वी ऋषि होऊन गेले. हे महर्षि भृगु ब्रह्मदेवाचे पुत्र होत. दैत्यांचे सामर्थ्यशाली गुरु शुक्राचार्य हे या भृगूंचे पहिले चिरंजीव. पुढें भृगूंनीं पुलोमा नांवाच्या एका अत्यंत सुंदर मुलीशीं लग्न केलें. संध्यावंदन, ध्यानधारणा, यज्ञयाग आदि आपलीं नेहमींचीं कृत्यें करीत ते पुलोमेसह सुखानें संसार करूं लागले.

एकदां महर्षि भृगु कांहीं कामानिमित्त दूर गेले होते. त्यांची पत्नी पुलोमा आश्रमांत एकटीच होती. अशा वेळीं एका दानवानें वेष बदलून त्या आश्रमांत प्रवेश केला. सती पुलोमेनें अतिथि समजून त्याचा सत्कार केला. तेव्हां तो दुर्बुद्धि म्हणाला,



BVBK-0400351

" मी पुलोमा दानव आहे. हें आदरातिथ्य घेण्यासाठीं मी

आलों नाहीं. मला तूंच पाहिजेस, तुझ्या गोड संगतीचें अक्षय सुख लाभावें म्हणून मी तळमळत आहें. पूर्वी मी याचसाठीं तुझ्या वडिलांकडे गेलों होतों. त्यांनीं मला हांकून दिलें. परंतु मी निराश झालों नाहीं. तुझें लग्न झालें तरी तुला विसरूं शकलों नाहीं. त्या वेळेपासून मी तुझ्या पाळतीवर आहें. आज ही सोन्याची संधि मला लाभली. तूं माझ्याबरोबर चल."

पतिव्रता पुलोमेनें त्या दुष्टाचा खूप धिक्कार केला. तेव्हां तो उन्मत्त दानव तिला जबरदस्तीनें घेऊन चालला. ती गरीब अबला आक्रोश करूं लागली. परंतु तिला सोडविण्यास तेथें कोणीच नव्हतें. त्या वेळीं ती गरोदर होती. तिच्या उदरांतील गर्भाला तो अत्याचार सहन झाला नाहीं. पूज्य मातेच्या सतीत्व–रक्षणासाठीं त्यानें तेथेंच जन्म घेतला. त्या दिव्य बाळाच्या प्रखर तेजानें त्या पापी दानवाचें भस्म झालें. हा तेजस्वी बालक म्हणजेच महर्षि च्यवन होत.

महात्मा मनूनें आपली गुणवती कन्या आरुसी च्यवनाला दिली. आपलीं नित्यकर्मे यथासांग आचरीत आरुसीसह च्यवन आनंदांत दिवस घालवूं लागले. या वेळीं हैहय वंशाचें राज्य फार भरभराटीस आलें होतें. सर्वत्र त्यांचा धाक होता. ते राजे फार लोभी होते. महर्षि भृगु, त्यांचे नातेवाईक आणि स्नेही-सोबती यांपाशीं पुष्कळ धन असलें पाहिजे असें त्यांस वाटलें. परंतु तपालाच धन समजणारे ते तपस्वी खरें धन कोठून देणार ? तरीही हैहयांनीं संशयानें त्यांच्या कत्तली करण्यास सुरवात केली. लहानथोर, स्त्रीपुरुष हा भेद त्यांनीं पाहिला नाहीं. तेव्हां

आश्रमांतील स्त्रिया पर्वतावर गुहेंत जाऊन राहिल्या. तेथें जाऊन हैहयांनीं त्यांना ओढून बाहेर काढलें. त्यांचीं मुलें–बाळें ठार मारलीं. इतकेंच नव्हे तर गरोदर स्त्रियांचे गर्भपात करविले. स्त्रियांचे दीन आक्रान्त व बालकांचें करुण क्रंदन यांनीं तो भाग जणूं दुःखाच्या वणव्यांत होरपळून निघत असल्याचा भास होत होता. महातेजस्वी च्यवनांची कोमलहृदयी स्त्री आरुसी तेथेंच होती. तिला दिवस गेले होते. तिच्या उदरांतील गर्भाला तें निंद्य क्रूरकर्म सहन झालें नाहीं. त्यानें तत्काल जन्म घेतला. त्या वेळीं जोरानें वीज चमकावी त्याप्रमाणें झगझगीत प्रकाश पडला. त्यामुळें दुष्ट राजपुरुषांचे डोळे दिपले आणि ते अंध झाले.

स्वतःवर संकट येतें त्या वेळीं मनुष्याला आपल्या दुष्कर्मांची जाणीव होते आणि तो पश्चात्ताप करतो. त्या डोंगराळ भागांत कडेकपारींत आणि कांट्याकुट्यांत भटकत, ठेंचाळत, आणि आपटत ते आंधळे हैहय कितीतरी फिरले. भुकेनें व तहानेनें ते व्याकुळ झाले. अतिश्रमानें त्यांना ग्लानि आली. शेवटीं ते सती आरुसीला आणि नुकताच जन्मलेला परंतु बालरवीसारखा तेजस्वी असणारा जो और्व त्याला शरण गेले, तेव्हां त्यांना दृष्टिलाभ झाला. परंतु अत्यंत क्रुद्ध झालेल्या और्वाला आपला राग आवरतां येईना. तो सर्व हैहयवंशीयांना जाळून भस्म करील असें वाटूं लागलें. त्या वेळीं त्याची वडील मंडळी तेथें आली. त्यांनीं त्याची कशीबशी समजूत घातली. त्यानें त्या वेळीं आवरलेला क्रोधच जणूं पुढें वीर परशुरामाच्या रूपानें अवतरला.

प्रतापी और्वाचा पुत्र ऋचीक हा अत्यंत सामर्थ्यशाली होता.

कान्यकुब्ज देशाचा पराक्रमी राजा गाधी याची रूपगुणशालिनी कन्या सत्यवती हिच्याशीं त्याचा विवाह झाला. प्रथम राजा गाधीला मूल नव्हतें. खडतर तप केल्यावर ईशकृपेनें त्याला ही मुलगी झाली होती. सती सत्यवती पतिसेवेंत सदा लीन असे. परंतु तिलाही मूल नव्हतें. तिनें आपल्या सामर्थ्यवान पतीची विनवणी केली आणि आपणाला व आईला मुलगा होण्यासाठीं उपाय करण्यास सांगितलें.

ब्रह्मर्षि ऋचीकानें मंत्र म्हणून खिरीचीं दोन भांडीं तयार केलीं. तीं आपल्या प्रिय पत्नीला देत तो म्हणाला, "ही खीर क्षात्र तेजाची आहे. ही आपल्या आईला दे म्हणजे तिला जगज्जेता पुत्र होईल. ही दुसरी तूं घे. ग्रहगोलांमध्यें जसा सूर्य प्रमुख आहे, तसा ऋषिमुनींमध्यें मान्यता मिळविणारा पुत्र तुला होईल."

सत्यवतीच्या आईला वाटलें कीं, जांवईबापूंनीं आपल्या पत्नीकरितां महत्त्वाचा मंत्र म्हटला असेल. म्हणून तिनें ती खीर बदलली. ऋचीकाला व सत्यवतीला त्यामुळें दुःख झालें, कारण त्यामुळें ब्रह्मवंशामध्यें परमवीर क्षत्रिय निपजणार होता. सत्यवती काकुळतीस येऊन पतीला विनवूं लागली. तेव्हां ऋचीक म्हणाला,

"झाल्या गोष्टीला इलाज नाहीं. मी आतां एवढेंच करूं शकतों कीं, तुझा मुलगा शस्त्रधुरंधर न होतां तुझा नातु तसा होईल."

सत्यवतीचा ब्रह्मतेजानें संपन्न झालेला भाऊ तोच गायत्री मंत्राचा द्रष्टा ब्रह्मर्षि विश्वामित्र आणि तिचा शस्त्रधुरंधर नातु तोच वीर परशुराम.

❀

# बालपण व विद्यार्जन

सती सत्यवतीचा पुत्र पेटत्या अग्नीसारखा तेजस्वी होता, म्हणून त्याचें नांव जमदग्नि ठेवण्यांत आलें. तो आपल्या पूर्वजांना शोभण्यासारखाच बुद्धिमान, वेदवेत्ता, त्रिकालज्ञ आणि तपःसामर्थ्यानें संपन्न होता. त्या श्रेष्ठ ऋषीला रेणु देशच्या प्रसेनजित राजानें आपली लाडकी कन्या रेणुका अर्पण केली. रेणुकेला रुमण्वान, सुषेण, वसुमान आणि विश्वावसु असे चार पुत्र झाले. पांचवा पुत्र परशुराम. याचा जन्म वैशाख शुक्ल तृतीयेला झाला. हा सर्वांत लहान खरा, परंतु पराक्रमानें अत्यंत थोर होता.

लहानपणीं त्यानें इतर ऋषिकुमारांबरोबर वेदवेदांगांचा अभ्यास केला. त्यांतील त्याची बुद्धिमत्ता पाहून सर्वांना अचंबा वाटला. परंतु शस्त्रविद्येंतील त्याच्या प्रगतीला जोड नव्हती. त्या काळीं ब्राह्मण लोक शास्त्रांच्या अध्ययनाबरोबर शस्त्रास्त्रांचाही अभ्यास करीत. राजपुत्रांना युद्धविद्या शिकविण्यासाठीं ब्राह्मणच शिक्षक असत. मात्र ब्राह्मण लोक स्वतः शस्त्रांचा उपयोग करीत नसत. वीर परशुराम बालपणीं शस्त्रास्त्रांचेच खेळ खेळे. एकदां तर त्या बालवीरानें एका मस्त हत्तीशीं सामना करून त्याला पिटाळून लाविलें. तें पाहून सर्वांनीं तोंडांत बोटें घातलीं.

वीर परशुराम जेव्हां यौवनावस्थेमध्यें आला, तेव्हां बल, वीर्य, तेज, बुद्धि, ज्ञान, वैराग्य, तप यांमध्यें त्याची बरोबरी

करील असा दुसरा कोणीच नव्हता. आपल्या गुरुजवळील सर्व शास्त्रें, तसेंच धनुर्वेद यांमध्यें तो पूर्णपणें पारंगत झाला. तरीही त्याची शिकण्याची भूक शमेना.

शस्त्रास्त्रविद्येच्या आवडीमुळें तो कैलासाला भगवान् शंकरांपाशीं गेला. त्याची विद्येसंबंधी उत्सुकता, त्याकरितां पडतील ते कष्ट सहन करण्याची तयारी, येईल त्या परिस्थितीला तोंड देण्याचें त्याचें सामर्थ्य, त्याची एकाग्रता, विद्या ग्रहण करण्याची त्याची पात्रता आदि गोष्टी पाहून भगवान शंकर संतुष्ट झाले. त्यांनीं आपल्याजवळील सर्व शस्त्रें त्याला दाखवलीं आणि तीं अनेक प्रकारें कशीं वापरावीं हें शिकविलें. त्याचप्रमाणें सर्व अस्त्रेंही सप्रयोग त्याला दिलीं. थोड्याच काळांत त्यानें केलेली प्रगति पाहून ते प्रसन्न झाले. त्यांनीं आपला परशु त्याला बक्षीस दिला. याच परशूनें त्यांनीं महाबलाढ्य गजासुराचा वध केला होता. एकदां परीक्षा पाहावी म्हणून त्यांनीं परशुरामाशीं द्वंद्वयुद्ध केलें तेव्हां परशुरामानें त्यांच्याशीं वीरोचित सामना दिला. याच वेळीं त्याच्या परशूची जखम भगवान शंकरांच्या मस्तकाला झाली, म्हणून त्यांस खंडपरशू असें नांव मिळालें. आशुतोष शंकरांनीं या शौर्याबद्दल त्याचा गौरव करून "तुला नेहमीं यश, कीर्ति आणि विजय यांचा लाभ होईल," असा आशीर्वाद दिला व आपलें धनुष्य त्याला पुरस्कार म्हणून दिलें.

विद्यार्जनासाठीं परशुराम कैलासावर असतां एकदां शत्रूंचा नाश करणाऱ्या गणपतीशीं त्याचें युद्ध झालें. त्या वेळीं या

धाडसी युवकानें आपल्या परशूनें त्या अतुल विक्रमी गणपतीचा एक दांत तोडला व त्याला ' एकदंत ' बनविलें.

# आश्रमांत

शस्त्रास्त्रविद्येंत पूर्ण पारंगत होऊन आणि भगवान शंकराचा आशीर्वाद व प्रसाद मिळवून आपला आवडता पुत्र परशुराम परत आला हें पाहून त्याच्या मातापित्यांना फारच आनंद झाला. परशुराम मूळचाच अग्नीसारखा तेजस्वी. त्याच्या चेहऱ्यावरील बुद्धीची चमक झटकन कोणाच्याही डोळ्यांत भरत असे. त्यांत शास्त्राध्ययन आणि तपःसामर्थ्याची भर पडलेली, आणि आतां या क्षात्रविद्येची मिळालेली जोड व त्यामुळें आलेला अजिंक्यपणाचा आत्मविश्वास या सर्वांमुळें दोन प्रहरींच्या तळपणाऱ्या सूर्यासारखा तो अपूर्व कांतिमान दिसत असे. अतुल पराक्रमी आणि अत्यंत शक्तिशाली परंतु तितकाच नम्र आणि सद्गुणी असणाऱ्या त्या वीर युवकाबद्दल केवळ त्याच्या मातापित्यांनाच अभिमान वाटत असे असे नाहीं, तर त्याच्याशीं संबंध येणारा प्रत्येक इसम त्याच्यावर प्रेम करी आणि त्यांत आपलाच गौरव समजे. त्याच्या सहवासामध्यें आश्रमवासी सर्व लोकांचे दिवस आपापली नित्य कर्में करीत सुखानें आणि शांततेनें जात होते.

एके दिवशीं अनूप देशाचा हैहयवंशीय सम्राट विश्वविजयी सहस्रार्जुन त्या आश्रमामध्यें आला. कृतवीर्य या नांवाचा एक

महान पराक्रमी राजा हैहयवंशांत होऊन गेला होता. म्हणून सहस्रार्जुनाला कार्तवीर्य असेंही म्हणत. जगामध्यें आपण



अद्वितीय योद्धा व्हावें अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. त्यासाठीं त्यानें घोर तपश्चर्या केली. तपानें भगवान दत्तात्रेय प्रसन्न झाले. सहस्रार्जुन हात जोडून नम्रतेनें म्हणाला,

" भगवन, मला अमित बळ मिळावें. एकाच वेळीं हजारों वीरांना जिंकण्याचें सामर्थ्य मला असावें. "

भगवान दत्तात्रेय म्हणाले, " तथास्तु ! परंतु ध्यानांत ठेव, तूं आपण होऊन कोणाशीं वैर आरंभलेस, तर या वराचा फायदा तुला मिळणार नाहीं. "

हजार वीरांचें बळ लाभल्यामुळें त्याला सहस्रार्जुन असें नांव पडलें होतें. या अमित बळामुळें उत्मत्त झालेला कार्तवीर्य मोठें सैन्य घेऊन दिग्विजयास निघाला. चारही दिशा आपल्या

पराक्रमानें जिंकून त्यानें अपार कीर्ति आणि अगणित संपत्ति मिळविली. एकदां तर त्यानें महाप्रतापी रावणाला पकडून आपल्या माहिष्मती नगरीला नेलें होतें. ही माहिष्मती नगरी नर्मदानदीच्या तीरावर होती. मिळविलेल्या विजयानें धुंद झालेल्या सहस्रार्जुनाला सारे जग तुच्छ वाटूं लागलें. त्याने कोणताही विचार न करतां मन मानील तसे अत्याचार करावयास सुरुवात केली. निर्वैर, शांत आणि स्वतःच्या साधनेंत निमग्न असणाऱ्या ब्रह्मर्षि वसिष्ठांचा सुंदर आश्रम केवळ गंमत म्हणून त्यानें जाळून टाकिला. एकदां त्यानें आपली दृष्टि समुद्रकांठच्या लोकावर वळविली. तेव्हां त्यांनीं सांगितलें,

"हे महाबाहो, आम्हीं गरीब लोक आहोंत. तुला युद्धाची खुमखुमी असेल, तर वीर परशुरामाकडे जा."

वीर परशुरामाची कीर्ति त्याच्या कानावर गेली होती. पण बोलूनचालून ब्राह्मणपुत्र. तो काय लढणार असें त्यास वाटे. पण सर्वच लोक त्याची स्तुति करीत. तेव्हां हा वीरयुवक आहे तरी कसा, हें पाहाण्यासाठीं तो शिकारीच्या मिषानें निघाला. बरोबर पुष्कळ सैन्य होतें.

महर्षि जमदग्नींनीं अतिथि म्हणून आलेल्या त्या पराक्रमी राजाचें आणि त्याच्या सैन्याचें स्वागत केले. भूक, तहान आणि श्रम यांनीं व्याकूळ झालेल्या त्या सैन्याला जरा विश्रांति देऊन मग सुंदर षड्रसांचें भोजन दिलें. देवांनाही दुर्लभ असें तें अन्न पाहून सम्राट सहस्रार्जुन चकित झाला.

"भगवन, आपल्या तपोधनांच्या आश्रमामध्यें एवढी

सामग्री कोठून आणली आणि एवढ्या थोड्या वेळामध्यें ही योजना कशी सिद्ध झाली ? ”

त्यानें जिज्ञासेनें प्रश्न केला.

“ राजन, माझ्यापाशीं कामधेनु आहे. इच्छिलेली प्रत्येक वस्तु ती आम्हांस देते. तिच्या कृपेचें हें फळ आहे. ” महर्षि जमदग्नींनीं उत्तर दिलें.

तें ऐकून राजाला कामधेनूचा लोभ सुटला. तो तिची मागणी करीत म्हणाला,

“ असें रत्न इथें उकिरड्यावर पडण्यापेक्षां माझ्या राजवाड्यांतच जास्त शोभून दिसेल. ”

“ राजा, ही कामधेनूच आमचें सर्वस्व आहे. हिच्यापासूनच आम्हांला आमच्या सर्व गरजेच्या वस्तु मिळतात. हिच्याखेरीज आमचे व्यवहार चालावयाचे नाहींत. ”

महर्षींनीं स्पष्टपणें सांगितलें. तरीही तो मदांध राजा ती गाय बळजबरीनें घेऊन गेला.

दुर्दैवानें वीर परशुराम त्या वेळीं तेथें नव्हता. तो परत आला त्या वेळीं आश्रम अगदीं सुन्न होता. महर्षि जमदग्नि, माता रेणुका आदि सर्व लोक अगदीं उदास होते. कांहींतरी भयंकर दुःखकारक गोष्ट घडली असावी असें त्यास वाटलें. सर्वांना प्रिय असणारा तो वीरयुवक नम्रपणें पित्याजवळ जाऊन उभा राहिला. तेव्हां जमदग्नि म्हणाले,

“ परशुरामा, राजा सहस्रार्जुनानें जबरीनें आपली कामधेनु नेली आहे. ”

" काय, सहस्रार्जुनाला आपल्या बळाचा एवढा मद चढला आहे ? हातांत राजदंड वागविणाऱ्याकडून असा अन्याय ? सर्वांच्या हितचिंतनांत निमग्न असणाऱ्या तपस्व्यांचा असा अपमान ? "

वीर परशुरामाचे डोळे क्रोधानें लाल झाले. बाहु स्फुरूं लागले. ओंठ थरथर कांपूं लागले. चेहरा उग्र झाला. त्याचें भयानक रूप पाहून जमदग्नि म्हणाले, " बाळ, राग धरूं नको. राजाची समजूत घालून गाय घेऊन ये. "

" पिताजी, तुमची आज्ञा मला मान्य आहे. परंतु राजानें हट्टच धरला तर परिस्थितीला अनुसरून मला वागावें लागेल. "

वीर परशुरामानें उत्तर दिलें आणि तत्क्षणीं त्यानें सहस्रार्जुनाच्या राजधानीचा—माहिष्मतीचा रस्ता धरला.

## सहस्रार्जुनाचा वध

माहिष्मतीच्या वेशीवर येतांच महाबलि परशुरामानें मोठ्यानें घोष केला. तो ऐकून विश्वविजेत्या सहस्रार्जुनाच्याही हृदयांत धडकी भरली. उसनें अवसान आणून तो म्हणाला,

" ऋषिकुमार, माझ्यासारख्या रणधुरंधर सम्राटासमोर हा उद्धटपणा योग्य नाहीं. "

आपला जातिधर्म क्षमा, आणि पित्याचें वचन यांना स्मरून संयमानें परशुरामानें समजुतीच्या पुष्कळ गोष्टी त्याला सांगितल्या.

" प्रजेचें रक्षण करणें हा राजाचा धर्म आहे. कोणीं अनाचार केला तर तो राजदंडास पात्र होतो. असें असतां असा अत्याचार तुझ्यासारख्या जाणत्या राजानें करणें शोभत नाहीं. राजानें प्रजेचा छळ आरंभिल्यावर प्रजेनें कोणाकडे जावें ? त्यांतही आम्ही तपस्वी तर अगदीं निरुपद्रवी आहोंत. इतकेंच नाहीं, तर आम्हीं आमच्या तपाचा अंश राजांना देत असतों. हेतु एवढाच कीं, त्यांना आपलें कर्तव्य योग्य तऱ्हेनें पार पाडतां यावें. माझे वडील जमदग्नि हे त्रिकालज्ञ असून ऋषिकुलांत श्रेष्ठ आहेत. ही गाय हाच त्यांचा सर्व आधार आहे. या गाईखेरीज त्यांचे व्यवहार चालणार नाहींत. तेव्हां राजधर्म, नीति, शिष्टाचार आदि गोष्टी ध्यानांत घेऊन गाय परत करावी. "

यावर तो गर्वांध सम्राट म्हणाला, " तूं याचक आहेस, या कामधेनूखेरीज तुला पाहिजे तें मागून घे. "

" बरें तर, मला न्यायप्रस्थापनेसाठीं युद्ध दे, " नाइलाजानें वीर परशुरामानें सांगितलें.

त्या एकट्या ऋषिकुमारावर सम्राटाचें एक सेनापथक धावून गेलें. धडाडून पेटणाऱ्या अग्नीवर गवताची रास पडावी, तशी त्या सैन्याची स्थिति झाली. नंतर दुसरी तुकडी आली. तिचीही तीच गति झाली. अशा प्रकारें एकामागून एक आपल्यावर चालून येणाऱ्या सम्राटाच्या सतरा सेनाविभागांचा त्या वीरकुलकेसरीनें नाश केला. तेव्हां सहस्रार्जुनानें आपले खास

वीर त्याजवर पाठविले. परंतु ते सर्व रुद्ररूप धारण केलेल्या वीर परशुरामाच्या बाणांना बळी पडले. अग्नीप्रमाणें तळपणाऱ्या परशुरामाचा तो पराक्रम पाहून राजा सहस्रार्जुनाचे हजारही पुत्र रण सोडून पळून गेले. त्यांचा धिक्कार करून वीरकुलाभिमानी सहस्रार्जुन स्वतः पुढें झाला. महात्म्या परशुरामानें फिरून त्याला समजाविण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ !

नंतर त्या दोघांचें घनघोर युद्ध झालें. सहस्रार्जुन जणूं सहस्र बाहूंनीं एकदम पांचशें धनुष्यें चालवावीं अशा चपलतेनें शरवृष्टि करीत होता. परंतु वीरचूडामणि परशुराम आपल्या कौशल्यानें त्या सर्वांचें निवारण करून त्यावर मात करीत होता. मधून मधून युद्ध थांबवून तो राजाला समजाविण्याचा प्रयत्न करी.

"हें युद्ध आम्हां दोघांत चाललें आहे. परंतु याची झळ साऱ्या जगाला लागेल. आमच्या अस्त्रांच्या प्रयोगानें दुनियेचा नाश होईल. त्याखेरीज ही व्यक्तीव्यक्तीमधील भानगड जातीय तंट्याचें रूप घेईल आणि आपल्या समाजाचा संपूर्ण विनाश करील. ब्राह्मण आणि क्षत्रिय हीं आपल्या समाजाचीं जणूं दोन फुफ्फुसें आहेत. या दोहोंमध्यें द्वेष, मत्सर असतां कामा नये. त्यांचे व्यवहार प्रेमाचे आणि परस्परांना पूरक असे असले पाहिजेत. याकरितां सुविचारानें राजा, तूं आपला हट्ट सोडावा."

अशा तऱ्हेनें सर्वांच्या हिताच्या पुष्कळ गोष्टी वीर परशुरामानें सहस्रार्जुनाला सांगितल्या. परंतु त्या दुरभिमानी योद्ध्यानें त्याची अवहेलना करून परशुरामावर आक्रमण केलें. शेवटीं चंडप्रतापी परशुरामानें आपल्या परशूनें त्याचा वध केला.

कामधेनु घेऊन परशुराम परत आला; तेव्हां जमदग्नींना अत्यंत आनंद झाला. परंतु यासाठीं राजाचा वध झाला आहे. हें ऐकून त्यांना अतिशय दुःख झालें. ते म्हणाले.

“ परशुरामा, राजा हा विष्णूचा अंश आहे. तूं त्याचा वध केलास, ही अगदीं अनुचित गोष्ट झाली. यामुळें तुला पाप लागणार, हेंही वाईट. ”

“ पिताजी, माझा अगदीं नाइलाज झाला. मीं पुष्कळ सांगून पाहिलें. परंतु मदांध लोकांना सामोपचाराची भाषा समजतच नाहीं. आतां या पापाबद्दल मीं काय प्रायश्चित्त घ्यावें ? ” परशुरामानें विषण्ण चित्तानें विचारलें.

“ तूं तीर्थयात्रा करावी, म्हणजे पापक्षालन होईल आणि तुझ्या मनाला शांतीही लाभेल, ” जमदग्नींनीं दुःखित अंतःकरणानें सांगितलें.

पित्याची आज्ञा होतांच मर्यादाशील परशुराम तीर्थयात्रेला निघाला. काशी, प्रयाग इत्यादि ठिकाणीं जाऊन तेथून तो पुढें हरिद्वार, बद्रिकेद्वार येथें गेला. सुमारें एक वर्षानंतर तो घरीं परत आला. तेव्हां सर्वांना फार आनंद झाला.

पुढें सुखानें कालक्रमणा करीत असतां एकाएकीं एक भयंकर संकट त्या प्रेमळ कुटुंबावर ओढवलें. एकदां माता रेणुका नर्मदा नदीवर गेली होती. त्याच वेळीं वातकावत देशाचा राजा चित्ररथ आपल्या स्त्रियांसह त्याच नदीवर आला. त्यांची अगदीं मोकळेपणें चाललेली क्रीडा पाहून रेणुकेला मोह पडला. आश्रमास जावयाला आपणाला उशीर होत आहे. पतीच्या

होमहवनादि गोष्टींना त्यामुळें विलंब होणार, हें तिच्या ध्यानींच आलें नाहीं. जेव्हां ती भानावर आली, तेव्हां फार उशीर झाला होता. आपल्याकडून फार मोठा अपराध झाला आहे, या जाणिवेनें ती शरमली. कोपिष्ठ पतीच्या रागाच्या कल्पनेनेंच ती घाबरली. मान खालीं घालून ती आश्रमास परत आली.

तिला उशीर झालेला पाहून महाक्रोधी जमदग्नि आधींच रागावले होते. त्यांत तिला खिन्नपणें परत येतांना पाहून त्यांनीं अंतर्ज्ञानानें सर्व जाणलें.

"पापिणी, आपल्या निर्मल चारित्र्याला कलंक लाविलास!" क्रोधानें लाल होऊन थरथरत ते म्हणाले. त्यांनीं आपल्या चारही वडील मुलांना तिचा शिरच्छेद करण्यास सांगितलें. पित्यापुढें मान वांकवून बसलेली ती दीन माता पाहून त्या मातृभक्त मुलांना भडभडून आलें. पित्याची आज्ञा त्यांना मानतां येईना. परंतु त्यामुळें ते बिचारे कोपांध पित्याच्या शापाला बळी पडले.

इतक्यांत आपल्या मातापित्यांवर भक्ति करणारा परशुराम बाहेरून आला. तो सर्व प्रकार पाहून त्याच्या अंगावर कांटा उभा राहिला.

"परशुरामा, या तुझ्या मातेकडून पाप घडलें आहे. तूं तिचा वध कर" तामसी जमदग्नीनें कठोरपणें आज्ञा केली.

आपला पिता सर्वसमर्थ आहे, हें परशुराम जाणत होता. म्हणून त्यानें बिलकुल विचार न करतां त्यांच्या आज्ञेचें पालन केलें व आपल्या जन्मदात्या आईचा वध केला. तें दुष्कर कर्म

पाहून खुद्द जमदग्नींना धक्का बसला. कांहीं वेळानें ते भानावर आले. आपल्यामुळें आपल्या आज्ञाधारक मुलाच्या हातून असें अमानुष कृत्य घडलें, आणि त्यामुळें आतां तो अगदीं उदास आहे, असें पाहून ते म्हणाले,

"बाळ, चिंता करूं नकोस. तुझी काय इच्छा असेल ती सांग."

"पिताजी, माझी प्रेमळ माता मला पुन्हां परत मिळावी. झालेल्या गोष्टींचें तिला विस्मरण व्हावें. मातृवधाचें पाप मला लागूं नये. माझे बंधु मला पुन्हां मिळावेत. सामर्थ्यामध्यें मीं अद्वितीय असावें. तीर्थाटन आणि तपश्चर्या करण्यासाठीं मला दीर्घायुष्य लाभावें."

त्यानें नम्रपणें पित्याजवळ निवेदन केलें.

"तसेंच होवो!" असें म्हणून परमतेजस्वी जमदग्नींनीं आपल्या कमंडलूंतील पाणी मृतांच्या अंगावर शिंपडलें. त्याच क्षणीं माता रेणुका आपल्या चारही पुत्रांसह उठून बसली.

पुढें आश्रमांतील रोजचीं कृत्यें सुरळीत चालू झालीं. जो तो आपल्या स्नानसंध्या, यज्ञयाग, अध्ययन–अध्यापन आदि कामांत गढून गेला.

एके दिवशीं वीर परशुराम कोठें बाहेर गेला होता. इतर आश्रमवासी लोक आपापलीं कामें करण्यांत गुंतले होते. इतक्यांत एकाएकीं मोठा कोलाहल झाला. नंग्या समशेरी घेतलेले हजारों वीर आश्रमांत घुसले. काय घडत आहे याचा कोणालाही पत्ता लागण्यापूर्वीं ते महात्मा जमदग्नीसमोर येऊन उभे राहिले.

" आम्ही सम्राट सहस्रार्जुनाचे पुत्र आहोंत. पितृवधाचा सूड घेण्यासाठीं आम्ही आलों आहोंत, " असें त्यांनीं सांगितलें आणि महर्षि जमदग्नि कांहीं हालचाल करण्यापूर्वीच त्यांचें शिर धडापासून वेगळें केलें.

पतिव्रता रेणुका धांवतच बाहेर आली. तिच्या आक्रांताकडे त्या नरराक्षसांनीं लक्ष दिलें नाहीं. इतकेंच नव्हें, तर त्या दीनदुःखी सतीला आपल्याबरोबर फरफटत ओढीत ते माहिष्मतीला घेऊन गेले.

वीरवर परशुराम परत आला. त्याला झालेला प्रकार कळतांच त्याच्या क्रोधाला सीमा राहिली नाहीं. त्याचें रूप धगधगत्या आगीसारखें दिसूं लागलें. त्यानें मन घट्ट करून आपल्या पित्याची अंत्यक्रिया केली. मग तो आपला परशु घेऊन व धनुष्य सज्ज करून झंझावातासारखा निघाला.

माहिष्मतीच्या वेशीवर येतांच त्यानें जोरानें धनुष्याचा टणत्कार केला. सहस्रार्जुनाचे पुत्र अगदीं तयारच होते. तरीही त्या भयंकर आवाजानें त्यांचा आत्मविश्वास डळमळला.

त्यांनीं या वेळीं खूप तयारी केली होती. आपलें सर्व सैन्य त्यानीं सज्ज ठेविलें होतेंच. त्याखेरीज आपले सर्व सरदार, मांडलिक आणि स्नेही राजे त्यांनीं निमंत्रण देऊन आणिले होते. वीरांचा जणूं एक महासागर तेथें जमला होता. वीरांचा उत्साह याच जणूं प्रचंड लाटा त्यावर उसळत होत्या. वीरांचे रणघोष हेंच त्या महासागराचें गर्जन होतें, वीरश्रेष्ठ परशुरामरूपी वादळ येतांच तो सेनासागर खळबळून गेला.

महाभयंकर युद्ध झालें. हत्तींचे चीत्कार, घोड्यांचें खिंकाळणें, वीरांच्या गर्जना, सुटणाऱ्या बाणांचा सणसण आवाज यांनीं दिशा भरून गेल्या. रक्ताचे पूर वाहाले. मांसाचा चिखल झाला. परंतु शेवटीं भगवान विष्णूपुढें जसा दैत्यांचा नाश होतो, त्याचप्रमाणें ते अनाचारी कार्तवीर्य, विक्रमी परशुरामाच्या शस्त्रास्त्रांनीं पराभूत झाले.

वाडवडिलांपासून अत्याचाराचें जें पाप कार्तवीर्यांनीं पेरलें होतें, त्याचीं विषफळें आज त्यांना चाखावीं लागलीं. कितीही बळ प्राप्त झालें तरी मनुष्यानें उन्मत्त होऊं नये; दीनदुबळ्यांचा छळ करूं नये. माणसाच्या सहनशक्तीला एक मर्यादा असते. तिचें उल्लंघन झालें कीं पीडित जनतेंतून वीर–कुल–केसरी परशुराम अवतीर्ण होतो आणि मदांध अत्याचाऱ्यांचीं मस्तकें धुळींत लोळवितो.

ईश्वर कृपा करतो त्या वेळीं मनुष्याला आपली चूक कळून येते व तो आपला मार्ग सुधारतो. नाहीं तर तो त्याच त्याच चुकांची पुनरावृत्ति करतो आणि प्रत्येक वेळीं वाढत्या श्रेणीचें प्रायश्चित्त त्याला घ्यावें लागतें. पहिल्या लढाईत कार्तवीर्यांचा संपूर्ण पराभव झाला होता. परंतु हा अपमान त्यांना सलूं लागला. त्यांच्या हृदयांत सूडाची आग धगधगूं लागली. त्यांनीं पुन्हां तयारी केली. ह्या वेळीं देशोदेशींचे अनेक राजेरजवाडे त्यांनीं आपल्या मदतीला बोलाविले. एका वीर युवकाकडून आपल्या एका राजवंशाचा नाश झालेला पाहून ते आधींच

चिडले होते. जय्यत तयारी करून मोठ्या उत्साहानें ते एकत्र जमले आणि त्यांनीं परशुरामाला आव्हान दिलें.

कार्तवीर्यांचा पाडाव करून परत फिरल्यावर परशुराम आपल्या नेहमींच्या ब्रह्मकर्मांत निमग्न झाला होता. शांत आणि निर्वैर ऋषिमुनींमध्यें तोही आपली तपःसाधना करीत होता. आपण होऊन तो कोणाच्याही वाटेला गेला नव्हता. त्यामुळें आपल्याविरुद्ध एवढी मोठी योजनाबद्ध मोहीम निघेल असें त्याला स्वप्नांतही वाटलें नव्हतें. परंतु जेव्हां त्याला डिवचण्यांत आलें, तेव्हां तो क्रोधानें बेफाम झाला. त्याचें क्षात्रतेज उसळून निघालें.

"हे लोक अत्याचारी आहेत. शांत आणि साधुशील लोकांना हे त्रास देतात आणि त्यांतच यांना आनंद वाटतो. निरपराधी लोकांना यांनीं किती पीडिलें आहे? गरीब बिचारी जनता यांचा प्रतिकार करूं शकत नाहीं, म्हणून यांना रान मोकळें वाटून हे शेफारून जातात आणि यांच्या अत्याचारांना ऊत येतो. लोकांच्या चांगूलपणाला हे दुबळेपणा समजतात आणि त्याचा हे अयोग्य फायदा घेतात. त्यांच्या पापाचें एवढें मोठें प्रायश्चित्त मीं यांना दिलें, तरी यांची समजूत पडलेली दिसत नाहीं. जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं, हेंच खरें. आपला संपूर्ण नाश करून घेतल्याखेरीज हे लोक आम्हांला शांतपणें जगूं देणार नाहींत."

असा विचार करून तो उठला. त्यानें आपला परशु घेतला, धनुष्य सांवरलें, आणि त्वेषानें रुद्ररूप धारण करून तो कार्तवीर्यांवर चालून गेला. ३५१

या वेळीं राजमंडळानें भक्कम तयारी केली होती. समुद्राच्या तुफानी लाटेसारखे ते परशुरामावर चालून आले. परंतु अभेद्य खडकावर समुद्राची प्रचंड लाट घों घों करीत येऊन जोरानें आदळावी आणि शतधा विदीर्ण होऊन तिचा नाश व्हावा, तीच स्थिति त्या राजमंडळाची झाली.

या युद्धानें परशुरामाचा राग शांत झाला नाहीं. राजमंडळाला पक्का धडा शिकवावा या हेतूनें उन्माद चढल्याप्रमाणें सर्व राजांवर त्यानें मोहीमच काढली. तो नर्मदाकांठापासून थेट हिमालयापर्यंत गेला आणि काश्मीर, दरद, कुंति, क्षुद्रक, मालव, अंग, वंग, कलिंग, ताम्रलिप्त, रक्षोवार, वीतिहोत्र, त्रिगर्त, मार्तिकावत, शिबी इत्यादि देश त्यानें जिंकले. या देशांच्या पाडावासाठीं त्यानें लागोपाठ एकवीस लढाया दिल्या व अपूर्व यश मिळविलें. या लढायांमध्यें राजमंडळाचा एवढा मोठा नाश झाला कीं, ते वीर पुढें परशुरामाच्या नांवालाही चळचळां कांपूं लागले.

असें सांगतात कीं, वीर परशुरामानें शत्रूंच्या रक्तानें पांच डोह भरले. ते स्यमंतपंचक या नांवानें प्रसिद्ध आहेत. तेथें त्यानें अत्याचाराला बळी पडलेल्या आपल्या पितरांचें तर्पण केलें. हेच डोह पुढें तीर्थें मानिलीं जाऊं लागले.

# पृथ्वीदान

वीर परशुरामाचा हा दिग्विजय मुलुखगिरीकरितां नव्हता. अत्याचाराचा प्रतिकार एवढीच भावना त्याच्या मुळाशीं होती. म्हणून त्यानें एक मोठा यज्ञ केला. जिंकलेली सर्व भूमि त्यानें ऋषिश्रेष्ठ कश्यपांना दान दिली, आणि मिळविलेली सर्व संपत्ति ब्राह्मणांना आणि याचकांना वाटून दिली.



वीर परशुरामानें मिळविलेलें यश अत्यंत विशाल होतें परंतु त्याचा दर्प त्याला चढला नाहीं. तो स्वतः सवाई अत्याचारी झाला नाहीं, कीं पूर्वीचें वैर स्मरून पराभूतांवर त्यानें वर्चस्व गाजविलें नाहीं, कारण तो वेदवेत्ता आणि तपस्वी होता. जगाचें कल्याण चिंतणें हा त्याचा धर्म होता. स्वार्थनिरपेक्षता हा त्याचा स्वभाव होता. संयम त्याचे अंगीं बाणला होता. क्षमा हा आपला

कुलधर्म तो विसरला नव्हता. आपद्धर्म म्हणून त्याला शस्त्र घ्यावें लागलें. परंतु काम होतांच त्यानें स्वखुषीनें तें खालीं ठेविलें. जिंकलेली भूमि आणि मिळविलेली संपत्ति त्यानें दान केली. मनांतून द्वेष, मत्सर, वैरभाव समूळ टाकून दिला, आणि तपश्चर्या करण्यासाठीं महेंद्रपर्वतावर एकांतांत निघून गेला. म्हणूनच लोक त्याला ईश्वराचा सहावा अवतार समजतात.

झाल्यागेल्या गोष्टी सर्वांनीं विसराव्या आणि सर्वांनीं पुन्हां प्रेमानें एकत्र येऊन आपल्या राष्ट्राची उन्नति साधावी, म्हणून भगवान कश्यप आदि ऋषिमुनींनीं पुष्कळ प्रयत्न केले. परंतु वीर परशुरामाचा धाक घेतलेले राजपुरुष पुढेंच येत ना. त्यामुळें सर्वत्र बेबंदशाही माजली. अनार्यांनींही उचल खाल्ली. नर्मदाकाठीं वसाहत केलेल्या आर्यांना माघार घ्यावी लागली. पुढें तर त्यांना यमुनाकांठापर्यंत पाठीं हटावें लागलें. भगवान कश्यपांनी वैश्य, शूद्र वगैरे लोकांना घेऊन शांतता व सुव्यवस्था राखण्याचा प्रयत्न केला, परंतु तो अयशस्वी झाला. तेव्हां त्यांनीं ही परिस्थिति तपस्वी परशुरामाला समजावून दिली.

" परशुरामा, तुझी भीति घेतलेले हे क्षत्रिय वीर तूं येथें असतां पुढें येणार नाहींत. म्हणून सर्वांच्या हितासाठीं तूं हा देश सोडून जावें. "

राष्ट्रहितासाठीं तो निःस्वार्थी महात्मा त्याच क्षणीं आपली प्रिय मातृभूमि सोडून दक्षिणेकडे निघून गेला.

तो देश सोडून गेल्यावर ठिकठिकाणीं लपून राहिलेल्या आणि परागंदा झालेल्या राजपुरुषांना भगवान कश्यपांनीं अभय दिलें

व पुन्हां देशांत आणिलें. निरनिराळ्या राजधान्यांमध्यें भगवान कश्यपांनीं तेथील मूळच्या राजवंशांच्या योग्य वारसांना राज्याभिषेक केले. ठिकठिकाणीं राजसंस्था फिरून स्थापन झाल्या. भगवान कश्यपांच्या प्रयत्नानें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र वगैरे सर्व वर्णांमध्यें पुन्हां स्नेहसंबंध निर्माण झाले.

आधुनिक दृष्टिकोनांतून बोलावयाचें तर वीर परशुरामानें अत्याचारी राजवंशांचा उच्छेद करून क्रांति केली, परंतु लोकशाहीची कल्पना डोळ्यापुढें नसल्यामुळें पुढील जम त्याला बसवितां आला नाहीं. हें काम भगवान कश्यपांनीं केलें. त्यांनीं राजसंस्था पुन्हां स्थापन केली आणि सर्व वर्णांमध्यें राष्ट्रा-संबंधीं आपलें कांहीं कर्तव्य आहे ही जाणीव निर्माण करून या राष्ट्रधर्मावर त्या सर्वांमध्यें मेळ घडवून आणला.

## विधायक कामगिरी

देशत्याग केल्यावर वीर परशुराम दक्षिणेकडे समुद्रकांठीं गेला. तेथें त्यानें आर्यांची वसाहत स्थापन केली. ही वसाहत परशुराम क्षेत्र या नांवानें प्रसिद्ध आहे. हें परशुराम क्षेत्र म्हणजेच आपलें कोंकण होय. पुढें तेथून तो आणखी दक्षिणेकडे गेला. मलबार किनाऱ्यावर त्यानें एक वसाहत स्थापन केली. आजही कोंकण आणि मलबार या प्रांतांतील अनेक लोक आपणाला वीर परशुरामाचे वंशज समजतात. मलबारमध्यें वीर परशुरामाचा शकही चालू आहे. त्याला कोल्लमआंडु असें म्हणतात.

वीर परशुरामानें वसाहती स्थापन केल्या खऱ्या, परंतु त्याचा स्वभाव विरक्त तपस्व्याचा होता. त्यामुळें या व्यापाचा त्याला लवकरच वीट आला, आणि तो जगापासून दूर महेंद्र पर्वतावर तपश्चर्या करण्यास निघून गेला. महेंद्र पर्वत हेंच त्यानें आपलें निवासस्थान बनविलें. त्याच्या ओढीनें अनेक ऋषि मुनि तेथें राहावयास गेले. तपश्चर्येखेरीज इतर काळ तो अध्ययन–अध्यापनामध्यें घालवी. तीर्थाटनाचाही त्याला फार नाद होता.

भगवान कश्यपांनीं राजसंस्थेची पुन्हां स्थापना केली, परंतु परशुरामाचा या राजपुरुषांवर विश्वास नव्हता. कित्येक वेळां मागील गोष्टी आठवत, तेव्हां तो उदास होई. राजर्षि जनकाच्या धर्मपरायणतेनें मात्र त्याच्या आशेला अंकूर फुटले. त्या दोघांमध्यें गाढ स्नेह जमला, स्नेहशील परशुरामानें भगवान शकरांकडून मिळालेलें धनुष्य आपली आठवण म्हणून जनकाच्या स्वाधीन केलें. या धनुष्याला दोरी चढवील त्याला आपली लाडकी कन्या सीता द्यावयाची, असा पुढें जनकानें पण केला.

अयोध्येच्या सूर्यवंशांतील राजे अत्यंत न्यायप्रिय आणि प्रजावत्सल होते. त्याच्या या नीतीनें सरळ मनाच्या परशुरामाची आशा वाढीस लागली. पुढें महाराज दशरथ यांचा पुत्र रामचंद्र याची कीर्ति त्याच्या कानीं गेली. तेव्हां आतां काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं असें त्यास वाटूं लागलें. परंतु आर्यावर्तातील सर्व राजेलोकांवर वचक बसवील आणि त्यांना धर्ममार्गावरून ढळूं देणार नाहीं इतकें सामर्थ्य त्या धर्मशील, नीतिकुशल आणि प्रजाहिततत्पर रामचंद्रामध्ये आहे का ? ही

कसोटी त्याला लावावयाची होती. धुरंधर धनुर्धारी रामचंद्रानें राजर्षि जनकाचा पण जिंकला. त्यानें परशुरामाच्या शिवधनुष्यास दोरी चढवून तें मोडून टाकिलें. पुढें सीतेबरोबर त्याचें लग्न झालें. वऱ्हाडी मंडळी जनकपुरी मिथिलेहून निघून अयोध्येस चालली होती. प्रतापी रामचंद्राचा तो पराक्रम ऐकून परशुरामाला फार आनंद झाला. रामचंद्राला प्रत्यक्ष पाहावें म्हणून तो निघाला. बाहेरून त्यानें मोठ्या रागाचा आविर्भाव केला, कारण त्याला रामचंद्राची परीक्षा घ्यावयाची होती. त्याला पाहातांच महाराज दशरथ आदि लोकांची गाळण उडाली. परशुरामानें आपलें वैष्णव धनुष्य रामचंद्रापुढें केलें. वीराग्रणी रामचंद्रानें त्या धनुष्यास दोरी चढविली. तेव्हां परशुराम संतुष्ट झाला.

"वीरवर रामचंद्रा, मीं तुझे गुण आणि पराक्रम ऐकिले आहेत, परंतु प्रत्यक्ष पाहून खात्री करून घ्यावी म्हणून मी येथें आलों. तुझ्याकडून धर्माची स्थापना होईल अशी माझी खात्री आहे. माझ्या सर्व चिंता दूर झाल्या."

असें सांगून तो महेंद्र पर्वतावर निघून गेला. आतां त्याला कसलीच विवंचना राहिली नव्हती. त्याचीं दैनिक कृत्यें स्वस्थ मनानें यथासांग चाललीं होतीं. शस्त्रें आणि शास्त्रें यांमध्यें त्याचा हात धरणारा कोणीच नव्हता. त्यामुळें त्याजकडें पुष्कळच विद्यार्थी येत. स्नेहमय परशुराम त्यांना अत्यंत प्रेमानें शिकवीत असे. नाहींतरी महात्म्याचें जीवन परोपकारासाठींच असतें. त्याचा शिष्यसंप्रदाय मोठा होता. विशेषेंकरून धनुर्वेद शिकण्यासाठीं ब्राह्मणकुमार आणि क्षत्रियकुमार त्याजकडे येत. परमप्रतापी

आणि दृढप्रतिज्ञ भीष्म हा त्याचा सर्वांत आवडता शिष्य होता. कौरवपांडवांचे गुरु द्रोणाचार्य सुद्धां युद्धविद्या परशुरामापासूनच शिकले. भारतीय युद्धांतील प्रसिद्ध महारथी, दानवीरांचा अग्रणी आणि सम्राट दुर्योधनाचा परममित्र कर्ण यानेंही परशुरामापाशीं अध्ययन केलें होतें.

अध्यापनासारखी त्याची आवडती दुसरी गोष्ट म्हणजे तीर्थाटन होय. असेंच तीर्थाटण करीत असतां एकदां त्याची भगवान श्रीकृष्णाशीं गांठ पडली.

मगध देशाचा सम्राट जरासंध याचें भगवान श्रीकृष्णाशीं हाडवैर होतें. त्याचा नाश करण्यासाठीं जरासंधानें मथुरेवर स्वारी केली. आपल्यामुळें इतरांना त्रास भोगावा लागूं नये म्हणून श्रीकृष्ण बलरामासह मथुरा सोडून दक्षिणेकडे निघून गेला. सुदैवानें करवीरजवळ त्यांची महात्मा परशुरामाशीं गांठ पडली. त्यानें त्या उभयतांना गोमंतक पर्वतावर नेलें. तेथें गुप्त जागीं असलेला शस्त्रांचा मोठा सांठा दाखविला. येथें श्रीकृष्ण आणि बळराम यांनीं युद्धविशारद परशुरामाच्या सांगण्यावरून डोंगरी युद्ध केलें आणि जरासंधाच्या सैन्याचा फन्ना उडविला.

महेंद्र पर्वत हें महात्मा परशुरामाचें निवासस्थान खरें, परंतु तेथेंही तो क्वचितच भेटत असे. पांडव तीर्थयात्रेस गेलें त्या वेळीं महेंद्र पर्वतावर गेले होते. तेथें सुदैवानें त्यांना महात्मा परशुरामाचें दर्शन झालें. त्यानंतर मात्र तो कोणाच्या दृष्टीस पडला नाहीं.

# जय की पराजय

धर्मशील परशुराम आपल्या उत्तर आयुष्याचे दिवस तपःसाधना आणि तीर्थयात्रा यांत घालवीत होता. त्यामध्यें त्याच्या दयाळूपणामुळें एकदां फार फार मोठें वादळ उठलें होतें, म्हणून त्याला फिरून शस्त्र घ्यावें लागलें होतें.

काशीदेशच्या राजाला अंबा, अंबिका, आणि अंबालिका या नांवाच्या तीन सुंदर आणि सद्गुणी मुली होत्या. त्यांची कीर्ति सर्वत्र पसरली होती. अनेक राजपुत्रांनीं त्यांना मागणी घातली होती. काशीराजानें त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें त्यांचें स्वयंवर मांडलें. देशोदेशींचें राजकुमार स्वयंवरास आले होते. हस्तिनापुराहून पराक्रमाचा जणूं सूर्य असा भीष्म गेला होता. त्यानें त्या तीनही सुंदर मुलींचें हरण केलें. इतर राजपुत्रांनीं त्याला अडथळा केला, परंतु युद्धामध्यें भीष्मानें त्या सर्वांचा पराभव केला.

भीष्म बालब्रह्मचारी होता. लग्न न करण्याची त्यानें शपथ घेतली होती. या मुली त्याने आपला सावत्र भाऊ विचित्रवीर्य याच्यासाठीं आणल्या होत्या.

या तीन बहिणींमध्यें अंबा सर्वांत थोर होती. मद्र देशाचा राजा शाल्व याच्यावर तिचें प्रेम होतें. शाल्वाचेंही तिजवर प्रेम होतें. तिनें भीष्माला ही गोष्ट सांगितली. उदार भीष्मानें तिला सन्मानपूर्वक शाल्वाकडे पाठविलें. परंतु अभिमानी शाल्व तिचा स्वीकार करीना. तेव्हां तिला हताश होऊन भीष्माकडे परत येणें

भाग पडलें. तिनें भीष्मालाच आपणाशीं लग्न करण्यास सांगितलें. परंतु भीष्म हा बालब्रह्मचारी होता. त्यामुळें त्यानें अंबेबरोबर लग्न करण्याचें नाकारलें. तेव्हां तिनें आपली अशी स्थिति करणाऱ्या भीष्माचा सूड घ्यावयाचें ठरविलें.

तेजस्वी अंबेनें अनेक रथी महारथींकडे मदत मागितली परंतु स्वयंवराचे वेळीं एकट्या भीष्मानें त्या सर्वांचा पुरा पराभव केला होता ही गोष्ट ते विसरले नव्हते. त्यामुळें सर्वांकडून अंबेची निराशाच झाली. शेवटीं ती परशुरामाला शरण गेली.

अंबेची दीन कहाणी ऐकून कोमल मनाच्या परशुरामाला दया आली. आपला आवडता शिष्य भीष्म याजकडून एका स्त्रीच्या जन्माचें मातेरें झालें हें पाहून त्याला अत्यंत वाईट वाटलें. परंतु भीष्माची आपणांवर भक्ति आहे, आपण सांगितलें तर तो नीति जाणणारा असल्यामुळें ऐकेल, असा त्याचा विश्वास होता. त्यानें भीष्माला बोलावून घेतलें आणि सांगितलें,

" भीष्मा, तूं धर्मज्ञ आणि नीतिकुशल आहेस. मग तूं ब्रह्मचारी असून या स्त्रियांचें हरण कसें केलेंस ? तूं जाणतोस कीं स्त्रिया या वीरपुरुषांनाच वरूं इच्छितात. पण हरण झालेल्या मुलीशीं कोणीही स्वाभिमानी वीर लग्न लावणार नाहीं. अशा स्थितींत अंबेची जी निराधार आणि दया करण्यासारखी अवस्था झाली आहे त्याची जबाबदारी तुझ्यावरच नाहीं का ? एका राज-कुलीन मुलीचे धिंडवडे तुझ्यामुळें निघाले आहेत. तिच्याशीं विवाह करून तिचा उद्धार करणें तुझें कर्तव्य आहे. "

" गुरुदेव, मीं लग्न न करण्याची शपथ घेतली आहे. मला

क्षमा करा. " नम्रतेने पण अशब्दीं स्पष्टपणें दृढनिश्चयी भीष्मानें उत्तर दिलें.

परशुरामानें परोपरीनें त्याला समजाविण्याचा प्रयत्न केला. परंतु तें सर्व व्यर्थ गेले. तेव्हां काम चिडीस गेलें आणि शेवटीं युद्धाचा प्रसंग आला. परशुराम आणि भीष्म, गुरु आणि शिष्य, दोघेही दृढनिश्चयी. दोघेही कधींच माघार न घेणारे. दोघेही अमितबलशाली, दोघेही अतुल धनुर्धारी. दोघेही अजिंक्य वीर. तेव्हां युद्ध भयंकर होणार, त्यांच्या अस्त्रप्रयोगामुळें जगामध्यें प्रलय माजणार, या भीतीनें पुष्कळ थोरांमोठ्यांनीं त्यांना समजाविण्याचा प्रयत्न केला, परंतु आपलें म्हणणें कोणीही सोडीना. गंगेच्या किनाऱ्यावर युद्ध सुरू झालें. तें पाहाण्यास देव, गंधर्व, यक्ष, किन्नर आणि पुष्कळ मानवसमाज जमला होता. भीष्म रथांत होता. त्यानें कवच धारण केलें होतें. परंतु वृद्ध परशुराम उघडा आणि पादचारीच होता. तो म्हणे, "पृथ्वी हा माझा सुंदर रथ आहे, चार वेद हे बळकट आणि चपळ घोडे आहेत. त्रिपदा गायत्री माता हीच माझें रक्षा-कवच."

दोघांनींही अनेक शस्त्रें, निरनिराळ्या शक्ति व विविध अस्त्रें यांचे प्रयोग सुरू केले. त्यांचें शरचापल्य पाहाणारांचे डोळे दिपत. ते सणणण करीत जेव्हां शक्ति एकमेकांवर सोडीत, तेव्हां त्यांचें निवारण करतां येणें शक्य नाहीं आणि प्रतिपक्षी पडणार. असें वाटे. या शक्ति जेव्हां एकमेकांवर आदळत, तेव्हां वीज चमकावी तसा प्रकाश पडे. त्यांच्या शरवृष्टीनें सूर्य झांकला जाऊन अंधार पडे. ते एकमेकांचे बाण जेव्हां छेदून टाकीत

तेव्हां अग्नीच्या ठिणग्या पडत. त्यांनीं अस्त्रांच्या प्रयोगाला जेव्हां सुरवात केली तेव्हां त्यांच्या आगीच्या डोंबांत जगाची राखरांगोळी होणार या भीतीने सर्वांची गाळण उडाली. दोघेही वीर रक्तानें न्हाऊन निघाले. परशुरामानें तीक्ष्ण बाणांनीं भीष्माचे घोडे आणि सारथी मारले. रथ मोडला. कवच फोडलें. भीष्मानेंही आपल्या शस्त्रांचें पाणी परशुरामाला पाजिलें. एकमेकांच्या शक्ति लागून ते मधून मधून मूर्च्छा येऊन पडत तेव्हां एकच हलकल्लोळ माजे. असें एकवीस दिवस युद्ध चाललें. शेवटीं देवर्षि नारद, परशुरामाचे पूर्वज, भीष्माची आई गंगामाता, अष्टवसु आदि मंडळी मध्यें पडली. ते परशुरामाला म्हणाले,

"एका स्त्रीच्या अब्रूरक्षणासाठीं तूं युद्ध आरंभिलें आहेस, परंतु आतां जगाच्या कल्याणासाठीं हें बंद कर. तूं ब्राह्मण आहेस. क्षमा हा तुझा धर्म आहे. खेरीज तूं भीष्माचा गुरु आहेस, म्हणून मोठेपणा घेऊन तूं हें युद्ध बंद करावें."

त्यांच्या सांगण्यास मान देऊन निरभिमानी परशुरामानें शस्त्र खालीं ठेविलें. लगेच माता गंगा, अष्टवसु वगैरे लोक भीष्माकडे गेले. त्यांच्या सूचनेवरून भीष्म परशुरामाकडे आला. 'गुरुदेव' अशी हांक मारून त्यानें परशुरामाचे पाय धरले.

"वत्सा ऊठ, सदा विजयी हो!" महात्मा परशुरामांनीं त्याला आशीर्वाद दिला. तेव्हां सर्वांनीं एकच घोष केला.

"जय वीर–केसरी परशुराम ॥"

३५१

BVBK-0400351